प्र.मु.व.सं.महा. राज्य
नागपूर-४४० ००१
Dt. 30 MAY 2011
आवक क्रमांक 9253
कक्ष क्रमांक 2

**लेखानुदान - २०११-२०१२**

मुख्यलेखाशीर्ष "मागणी क्रमांक सी-७ -२४१५- कृषिविषयक संशोधन व शिक्षण (योजनेतर) (दत्तमत)" याखालील अनुदानाची नियंत्रणाधिकारी निहाय वाटणी.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग,
शासन निर्णय क्रमांक पी -२४१५/२०११-२०१२/प्र.क्र. ९० /ब-१
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक : १ एप्रिल, २०११

वाचा -महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, परिपत्रक क्र.लेखानु २०.११/ सी.आर.६५/ अर्थसंकल्प-३ दि.३१.३.२०११

**शासन निर्णय :-**

महाराष्ट्राच्या एकत्रित निधीमधून २०११-२०१२ या वित्तीय वर्षात पहिल्या दोन महिन्यांचा खर्च भागविण्यासाठी काही रकमा काढून घेण्यास शासनाला प्राधिकृत करणारे "महाराष्ट्र विनियोजन (लेखानुदान) विधेयक, २०११" मंजूर झाले आहे. सदर विधेयकाचे आता अधिनियमात रुपांतर झाले असून तो महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५ म्हणून महाराष्ट्र शासन राजपत्रात असाधारण भाग-४ मध्ये दिनांक ३१ मार्च, २०११ रोजी प्रसिध्द झाला आहे.

२. वरील परिच्छेदामध्ये उल्लेखिलेल्या अधिनियमाला अनुसरुन "मागणी क्रमांक सी-७-२४१५- कृषिविषयक संशोधन व शिक्षण (योजनेतर) (दत्तमत)" या मुख्यलेखाशीर्षाखालील १ एप्रिल २०११ ते ३१ मे २०११ या कालावधीतील खर्च भागविण्यासाठी सोबत जोडलेल्या तक्त्याच्या रकाना क्रमांक ४ मध्ये नमूद केलेली रक्कम संबंधित नियंत्रक अधिका-यांकडे या निर्णयाद्वारे सुपुर्द करण्यात येत आहे. तसेच सदर तरतुदी अर्थसंकल्प वितरण प्रणालीद्वारे उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

30 MAY 2011

३. नियंत्रक अधिका-यांनी या निर्णयाद्वारे त्यांच्याकडे सुपुर्द केलेले अनुदान त्यांच्या नियंत्रणाखाली प्राक्कलन अधिकारी असल्यास त्यांच्याकडे सुपुर्द करावे व तत्संबंधीच्या आदेशाच्या प्रती लेखापरीक्षा कार्यालय आणि ब-१ कार्यासनाला पाठवाव्यात. तसेच अर्थसंकल्प वितरण प्रणालीद्वारे तरतुदी वितरीत करण्याची कार्यवाही करावी. प्राक्कलन अधिका-यांकडे अनुदान सुपूर्द करताना त्यांना १ एप्रिल २०११ ते ३१ मे २०११ या मुदतीत त्यांच्याकडे सुपूर्द केलेल्या अनुदानापेक्षा कोणत्याही परिस्थितीत खर्च जास्त होणार नाही, याची दक्षता घेण्यास सांगावे.

962
3915/99 2 913

४. लेखानुदानात "खर्चाच्या नवीन बाबी" साठी केलेल्या तरतुदी समाविष्ट नसतात. त्यामुळे या निर्णयान्वये नियंत्रक अधिका-यांकडे वर नमूद केल्याप्रमाणे पहिल्या दोन महिन्यांचा खर्च भागविण्यासाठी सुपूर्द केलेल्या अनुदानातून नियंत्रण अधिका-यांनी नवीन खर्चाच्या बाबीवर खर्च करु नये.

५. सोबतच्या तक्त्याच्या रकाना क्रमांक ३ मध्ये नमूद केलेली रक्कम ही २०११-२०१२ या वित्तीय वर्षासाठीचे संपूर्ण अनुदान असून त्यामध्ये रकाना क्रमांक ४ मध्ये नमूद केलेली रक्कम सुध्दा समाविष्ट आहे.

६. या निर्णयासोबत जोडलेल्या तक्त्याच्या रकाना क्रमांक १ मध्ये दर्शविलेल्या गौण/उपशीर्षाखाली त्या त्या उप/तपशील शीर्षाला "संगणकयंत्र" संकेतांक दिले आहेत. ते नियंत्रक अधिका-यांनी "आहरण व संवितरण" अधिका-यांना अनुदान वाटतांना कळवावे आणि त्यांना दोन अंकी "प्रमाणभूत" बाब संकेतांक क्रमांकासह कोषागार/उपकोषागार यांच्याकडे पाठविण्यात येणा-या देयकासोबत जोडल्या जाणा-या "कॉम्प्युटर स्लीपमध्ये" न चुकता उल्लेख करण्याचे आदेश द्यावेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

**( आ.ज्ञा. होमकर )**
कार्यासन अधिकारी,
महसूल व वन विभाग.

**<u>सोबत : तक्ता</u>**

प्रति,

**प्रधान मुख्य वनसंरक्षक, महाराष्ट्र राज्य, नागपूर ([illegible])**
महालेखापाल-१/२ (लेखापरीक्षा), महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर (३ प्रती)
महालेखापाल-१/२ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर (३ प्रती)
**अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई-४०० ०३२**
अधिदान व लेखा अधिकारी, बांद्रा (पूर्व), मुंबई-४०० ०५१.
**निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई**
**वित्त विभाग (अर्थसंकल्प-६ अणि व्यय-९), मंत्रालय, मुंबई**
**अवर सचिव, पीएसी, पीएसी-१ कार्यासन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई**
**कार्यासन अधिकारी, फ-२/फ-७ कार्यासन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई**
लेखाधिकारी,फ-७ कार्यासन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
अवर सचिव, फ-१० कार्यासन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.
कार्यासन अधिकारी, फ-५ कार्यासन, महसूल व वन विभाग, मंत्रालय,मुंबई.
निवड नस्ती, ब-१ कार्यासन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.

शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्रमांक - पी २४१५/२०११-२०१२/प्र.क्र.९०/ब-१,

दिनांक १ एप्रिल, २०११ सोबतचा तक्ता

लेखाशिर्ष- "२४१५ कृषिविषयक संशोधन व शिक्षण " याखालील अनुदानाची नियंत्रणाधिकारी निहाय वाटणी

(योजनेतर) (दत्तमत)

(रुपये हजारात)

| लेख्याचे उपमुख्य/गौण/उपशिर्ष आणि संगणक सांकेतांक | नियंत्रक अधिकारी व खर्चाची बाब | २०११-२०१२ च्या अर्थसंकल्पात अंतर्भूत असलेली तरतूद (रकाना क्र.४ मधील तरतूदीसह) | १ एप्रिल, २०११ ते ३१ मे, २०११ या कालावधीतील खर्च भागविण्यासाठी सुपूर्द केलेली तरतूद |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| योजनेतर (दत्तमत) | | | |
| ०६- वनीकरण - (०४) संशोधन | | | |
| (००)(०१) संशोधन केंद्र व इतर चाचण्या (२४१५ ००१६) | ०१- वेतने | ६०००० | १०००० |
| | ०२- मजूरी | ४६८ | ७८ |
| | ०३- अतिकालीक भत्ता | १३ | २ |
| | ०६- दूरध्वनी, वीज व पाणी शुल्क | ९४ | १६ |
| | ११- देशांतर्गत प्रवास खर्च | १४०५ | २३४ |
| | १३- कार्यालयीन खर्च | १७०० | २८३ |
| | १४- भाडेपट्टी व कर | ८०० | १३३ |
| | १७- संगणक खर्च | १५ | ३ |
| | २१- पुरवठा व सामग्री | २५८ | ४३ |
| | २६- जाहिराती व प्रसिद्धी | ५ | १ |
| | २७- लहान बांधकामे | ४६३ | ७७ |
| | २८- व्यावसायिक व विशेष सेवा | ६ | १ |
| | एकूण (०४) | ६५२२७ | १०८७१ |
| २७७- शिक्षण | | | ० |
| (००)(०१) वन अधिका-यांना प्रशिक्षण (२४१५ ०४८२) | ०१- वेतने | ३३९६३ | ५६६१ |
| | ०२- मजूरी | ४४३ | ७४ |
| | ०३- अतिकालीक भत्ता | १५ | ३ |
| | ०६- दूरध्वनी, वीज व पाणी शुल्क | १२४ | २१ |
| | ११- देशांतर्गत प्रवास खर्च | १०७० | १७८ |
| | १३- कार्यालयीन खर्च | १४०० | २३३ |
| | १४- भाडेपट्टी व कर | १५० | २५ |
| | १६- प्रकाशने | ३ | १ |
| | १७- संगणक खर्च | ३३ | ६ |
| | २०- इतर प्रशासकीय खर्च | ५ | १ |
| | २१- पुरवठा व सामग्री | ९६ | १६ |
| | २७- लहान बांधकामे | १६० | २७ |
| | २८- व्यावसायिक व विशेष सेवांकरिता प्रदाने | ३० | ५ |
| | एकूण (२७७) | ३७४९२ | ६२४९ |
| | एकूण २४१५ - योजनेतर (दत्तमत) | १०२७१९ | १७१२० |

पृ 313

[signature]